जनहित याचिका क्र. १८२/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. ०७/०४/२०१७ रोजी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने उपयोगिता समिती गठित करणेबाबत.....

**महाराष्ट्र शासन**

**महिला व बाल विकास विभाग**

**शासन निर्णय क्र. बालगृ-२०१८/प्र.क.१७ /का ८**

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०७ फेब्रुवारी, २०१८.

वाचा : १. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५

२. केंद्रिय आदर्श बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम ,२०१६

३. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. १८२/२०१० प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश दि. ०७.०४.२०१७ मधील निर्देश.

**प्रस्तावना:-**

मा .उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. १८२/२०१० मा. उच्च न्यायालयाने दि. ०७/०४/२०१७ रोजीच्या निकाली काढलेली आहे. सदर जनहित याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशातील क्र. ६३ (h) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार ॲमीकस क्युरी श्रीम.आशा वाजपेयी यांच्या सल्ल्याने मतीमंद पीडित बालकांना मनोधैर्य योजनेखाली प्राप्त अनुदानाचे योग्य खर्चासाठी उपयोगिता समिती गठित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

सबब, सद्य:स्थितीत खालील प्रमाणे उपयोगिता समिती गठित करणेबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

**शासन निर्णय:-**

मा .उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. १८२/२०१० मा. न्यायालयाने दि. ०७/०४/२०१७ दिलेल्या आदेशातील क्र. ६३ (h) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार उपयोगिता समितीचे गठन या शासन निर्णयान्वये करण्यात येत आहे:-

**उपयोगिता समिती**

| अ. क्र. | नाव | समितीतील पद |
|---|---|---|
| १ | आयुक्त, अपंग कल्याण ३ चर्च रोड पुणे ४११००१ | अध्यक्ष |

| | | |
|---|---|---|
| २ | आयुक्त, महिला व बाल विकास २८ राणीचा बाग पुणे ४११००१ | सदस्य |
| ३ | श्री योगेंद्र शेट्टी महासंचालक National Society for Equal Opportunities for the Handicapped Postal Colony Road Chembur Mumbai ४०००७१ | सदस्य |
| ४ | श्रीमती शिरीष व्ही पुजारी Project Coordinator and Managing Trustee center for special children Swami Bramhanand Pratishtan ३/५३, Irani Building, R.B. Road,Mazgaon Mumbai ४०००१० | सदस्य |
| ५ | प्रा रुबिना शंकर लाल Managing Trustee Society of Parents of Children with Autistic Disorders (SOPAN) Natwar Nagar, Road no.५, jogeshwari E Mumbai ४०००६० | सदस्य |
| ६ | श्री यु. के शुक्ला Assistant Legal Advisor National trust Department of Empowerment Government of India, १६ B Bada Bazar Road, Old Rajinder Nagar New Delhi, ११००६० | सदस्य |
| ७ | श्री एस एन बाटलीवाला Chartered Accountant, Tata Institute of Social Science, Deonar, Mumbai ४०००८८ | सदस्य |
| ८ | ॲड मिहिर देसाई Senior Adovate, Hind Rajasthan Chambers, ४th Floor, Oak Lane, Fort Mumbai ४०००२३ | सदस्य |
| ९ | डॉ आशा बाजपेयी PPPrrrofessor of Law Tata Institute of Social Science, Deonar, Mumbai ४०००८८ | सदस्य |
| १० | श्रीमती सरीता शंकरन Social Worker and child Right Expert. ४ A,D wing , Siddhivinayak Tower, Kolbad, Thane W ४००६०१ | सदस्य |

२. उपरोक्त प्रमाणे गठित उपयोगिता समितीतील अशासकीय सदस्यांचा कालावधी नेमणूकीपासून तीन वर्षाचा राहील व ती खालीलप्रमाणे कार्य करील:-

१. बालकांचे हित विचारात घेवून पीडित प्रवेशितांना मनोधैर्य योजनेखाली देण्यात आलेल्या भरपाई रकमेचे योग्य व्यवस्थापन होत असल्याची खात्री करणेकरीता कार्यपध्दती विकसित करणे.

२. भरपाई रकमेतुन बालकांच्या कृती कार्यक्रम आयोजनासाठी सूचना देणे.
३. प्रत्येक बालकाच्या पुनर्वसन व पुन:स्थापनेसाठी कृती आराखडा निश्चित करण्यासाठी सूचना देणे.

३. अशासकीय सदस्यांना वित्त विभाग शासन निर्णय क्र. बैठक -२०१२/प्र.क्र.१/सेवा-५ दि.२४.५.२०१२ अन्वये बैठक भत्ता व शासन निर्णय क्र.प्रवास -१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दि. ३.३.१० मधील परिच्छेद-१२ मधील तरतुदीनुसार प्रवास भत्ता अनुज्ञेय राहील. यासाठीचा खर्च लेखाशिर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, १९९, अशासकीय संस्थांना सहाय्य, एकात्मिक बाल संरक्षण योजना, अंतर्गतच्या अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच सदर प्रकरणी नियंत्रण अधिकारी म्हणून आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, पुणे हे काम पाहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२०७१६३९१९६९३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Rangrao Waghmode

Digitally signed by Shrikant Rangrao Waghmode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Woman and Child Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7d6290e8e870a1c46cd16d3903f765faf7b03d01646947b584aa89c266409a04, cn=Shrikant Rangrao Waghmode
Date: 2018.02.07 16:45:58 +05'30'

**( श्रीकांत वाघमोडे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत-**

१. मा.राज्यपाल, यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई .
३. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा ,महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
४. मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद ,महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
५. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा /विधानपरिषद,महाराष्ट्र विधीमंडळ.
६. मा.मंत्री (म व बा वि)/ राज्यमंत्री(म व बा वि),यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई .
७. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव,मंत्रालय,मुंबई
८. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
१०.प्रधान सचिव (व्यय),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
११.प्रधान सचिव (ले व को),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१२.आयुक्त , महिला व बाल विकास आयुक्तालय,म.रा. पुणे.
१३.महालेखापाल १, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई
१४.महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),नागपूर
१५.संचालक,लेखा व कोषागरे संचालनालय,म.रा.मुंबई

१६.संचालक,स्थानिक निधी लेखा परीक्षा,कोकण भवन,नवी मुंबई

१७.सर्व उपसचिव ,सर्व अवर सचिव, महिला व बाल विकास. नवीन प्रशासकीय भवन , मुंबई

१८. उपायुक्त (बालविकास) महिला व बाल विकास आयुक्तालय, म.रा.पुणे.

१९.वित्त विभाग (व्यय-६/अर्थसंकल्प-७/कोषा-प्रशा-२), नियोजन विभाग (का-१४७२) मंत्रालय, मुंबई -३२,

२०.सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.

२१.सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन , मुंबई

२२.निवड नस्ती का-८.